



# भारतीय अर्थव्यवस्था
# Indian Economy

B. A. 5th Semester

By

. Dr. Rajani Sontakke
Associate Professor

# 1. भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप व प्रकार

## Nature & Types of Indian Economy

अर्थव्यवस्था: **अर्थ : Meaning**

18 व्या शतकाच्या उत्तरार्धात अर्थशास्त्राची शास्त्र म्हणून ओळख झाली. त्यापूर्वी त्याला सामाजिक शास्त्र म्हणूनओळखले जात होते. अर्थशास्त्रात सर्वच आर्थिक व्यवहारांचा अभ्यास केला जातो.

अर्थव्यवस्था तयार होण्याकरिता चार गोष्टी आवश्यक असतात.

1) उत्पादन : Production
2) उपभोग: Consumption
3) विनिमय: Exchange
4) वितरण किंवा विभाजन: Distribution/ Division

- ह्या चारही गोष्टींना आर्थिक व्यवहार म्हणतात. ह्या चारही आर्थिक व्यवहारातून अर्थव्यवस्था तयार होत असते.

- अर्थव्यवस्था कोणत्याही देशाचे उत्पादन, वितरण आणि विक्री यांची एक सामाजिक व्यवस्था असते.

# अर्थव्यवस्थेचे स्वरूप: Nature of Economy

- स्वातंत्र्य प्राप्तीनंतर नियोजनपूर्वक भारताचा विकास घडवून आणण्यासाठी भारताने मिश्र स्वरूपाची अर्थव्यवस्था स्वीकारली.
- मिश्र अर्थव्यवस्था म्हणजे सार्वजनिक व खाजगी क्षेत्र यांचेसहअस्तित्व असणे होय. भारतात सार्वजनिक क्षेत्राचा वाटा फार जास्त असल्यामुळे भारताच्या मिश्र अर्थव्यवस्थेला सफल बनविण्यासाठी सार्वजनिक क्षेत्र कारणीभूत ठरले.
- भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचा वाटा जी डी पी च्या 60% असून भारतातील एकूण 53% लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे.

- **अर्थव्यवस्थेची क्षेत्रे: Sectors of Indian Economy**


- **व्यवसायानुसार वर्गीकरण: Classification Of Business**

1. प्राथमिक क्षेत्र| : Primary Sector
2. द्‌वितीयक क्षेत्र: Secondary Sector
3. तृतीयक क्षेत्र: Tertiary Sector
4. चतुर्थक क्षेत्र :Fourth Sector




- **प्राथमिक क्षेत्र : Primary Sector**

प्राथमिक क्षेत्रात कृषी व कृषिशी समबंधीत नैसर्गिक स्रोतापासून केल्या जाणाऱ्या क्रिया, पशु संवर्धन, मत्स्य व्यवसाय, जंगले, खाणी, उत्खनन इ. व्यवसायांचा समावेश होतो.





## 2 द्वितीयक क्षेत्र : Secondary Sector

दवितीयक क्षेत्रात उदयोग क्षेत्र समाविष्ट आहेत. दवितीयक क्षेत्रात प्राथमिक क्षेत्रातून प्राप्त झालेल्या उत्पादनांचे रूपांतरण उदयोगातून उपयोग करून वस्तूंचे उत्पादन केले जाते.

कच्चया मालाचे पक्क्या मालात रूपांतरण करणे म्हणजे उदयोग होत.

बाष्प, वातानुकूलन, काच, वीज इ. चे उत्पादन ह्या क्षेत्रात होते.




## तृतीयक क्षेत्र : Terteiry Sector

तृतीयक  क्षेत्रात वरील दोन्हीं क्षेत्रांतून प्राप्त झालेल्या उत्पादनांचे समाजापर्यंत वितरण करणे ह्या क्रियांचा समावेश होतो.. ह्या क्षेत्रालाच सेवा क्षेत्र असे देखील म्हणतात. ह्या क्षेत्रात वितरण सेवा, वाहतूक, दळणवळण, व्यावसायिक सेवा ग्राहक सेवा व नो प्रॉफिट सेवा इ. चा समावेश होतो




- **चतुर्थक क्षेत्र: Fourth Sector**

- ह्यात माहिती तंत्रज्ञान सेवांचा समावेश होतो. संख्याशास्त्र, संशोधन व विकास मार्गदर्शन इ. चा ह्या क्षेत्रात समावेश होतो.

# अर्थव्यवस्थांचे प्रकार: Types of Economy

- अर्थव्यवस्था ही कोणत्याही देशाचे उत्पादन, वितरण आणि विक्री यांची एक सामाजिक व्यवस्था असते.
- अर्थव्यवस्था वेगवेगळ्या प्रकारच्या दिसून येतात.
- अर्थव्यवस्थांचे प्रकार पुढीलप्रमाणे:

**अर्थव्यवस्थेचे प्रकार**

1 भांडवलवादी अर्थव्यवस्था

2 समाजवादी अर्थव्यवस्था

3 मिश्र अर्थव्यवस्था

# 1. भांडवलशाही अर्थव्यवस्था
## Capitalist Economy

- ही मागणी आणि पुरवठ्याच्या सिद्धांता अंतर्गत बाजारात स्वतंत्रपणे कार्य करते.
- हिला बाजाराधिष्टीत अर्थव्यवस्था म्हणूनही ओळखले जाते.
- राज्य आणि केंद्र सरकारची भूमिका मर्यादित असते.
- ही निरहस्तक्षेपाच्या सिद्धांतावर आधारित आहे.
- उत्पादन साधनांच्या मालकीनुसार अर्थव्यवस्थेचा हा प्रकार  असून उत्पादन साधनांवर जसे- भूमी, भांडवल, श्रम आणि संगठन ह्यावर खाजगी व्यक्तीची मालकी असते.

# वैशिष्ट्ये: Characteristics

- खाजगी मालकी
- किंमत बाजारपेठ ठरवितात
- ग्राहक हा राजा असतो
- सरकारी हस्तक्षेप नाही
- मुक्त अर्थव्यवस्था
- फक्त नफ्याचा उद्देश
- कौशल्यास पूर्ण वाव असतो
- कोणताही उद्योग निवडण्याचे स्वातंत्र्य असते

# भांडवल शाही अर्थव्यवस्थेचे तोटे: Disadvantages of Capitalist Economy

- आर्थिक व सामाजिक विषमता वाढते.
- फक्त नफा हा उद्‌देश असतो. सामाजिक हिताकडे दुर्लक्ष केले जाते.
- गरिबी, बेरोजगारी इ. कडे दुर्लक्ष केले जाते.
- किमतीत वेगाने वाढ घडून येते व स्फिती ची स्थिती निर्माण होते.
- मंदी निर्माण होवून बेरोजगारीत वाढ होऊ शकते.
- चैनीच्या वस्तूंच्या उत्पादनाची मक्तेदारी निर्माण होते.

# 2. समाजवादी अर्थव्यवस्था: Socialist Economy

- अशी अर्थव्यवस्था ज्यामध्ये उत्पादनाच्या सर्व साधनांवर म्हणजे भूमी, भांडवल, श्रम व संघटन ह्यावर सरकार आणि समाज यांची मालकी असते.
- समाजवादी अर्थव्यवस्था ही कार्ल मार्क्स च्या सिद्धांताचे प्रतिपादन करते.
- ह्या अर्थव्यवस्थेला नियंत्रीत अर्थव्यवस्था सुद्धा म्हणतात.
- चीन, क्युबा, उत्तर कोरिया ह्या देशातील अर्थव्यवस्था समाजवादी अर्थव्यवस्थेचे उदाहरण आहेत.

# समाजवादी अर्थव्यवस्थेचे वैशिष्ट्ये:
## Characteristics of Socialist Economy

- संसाधनांचा वापर समाजहितासाठी करणे.
- उत्पादन नफ्यासाठी न करता समाजहितासाठी करणे.
- सामाजिक न्याय प्राप्त करण्याचा प्रयत्न करणे.

# समाजवादी अर्थव्यवस्थेचे फायदे व तोटे

- **फायदे**

1. आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण टाळले जाते.
2. सामाजिक न्यायाचे उद्दिष्ट.
3. ग्राहक हा राजा असतो.

- **तोटे**

1. संसाधनांचा अपव्यय होण्याची शक्यता.
2. राज्यकर्त्यांची हुकूमशाही निर्माण होऊ शकते.
3. कार्यक्षमतेत घट होऊ शकते.
4. व्यक्तिस्वातंत्र्याचा लोप होऊ शकतो.

# 3 मिश्र अर्थव्यवस्था: Mixed Economy

ह्या प्रकारच्या अर्थव्यवस्थेत सार्वजनिक आणि खाजगी अशा दोन्ही क्षेत्रे मिळून कार्य करीत असतात.
तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भांडवल व समाज ह्या दोन्ही चा चेहरा असलेली अर्थव्यवस्था
स्वातंत्र्य प्राप्तीनंतर स्वीकारली.
समाजवादी अर्थव्यवस्थेतील समाज आणि भांडवल शाही अर्थव्यवस्थेतील व्यक्तिगत हित ह्या दोन्हींना समान महत्त्व देऊन मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार करण्यात आला.

मिश्र अर्थव्यवस्था म्हणजे, **“ खाजगी व सार्वजनिक क्षेत्राचे सहअस्तित्व असलेली अर्थव्यवस्था होय.”**

# मिश्र अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये: Characteristics of Mixed Economy

- सार्वजनिक व खाजगी क्षेत्राचे सहअस्तित्व असते.
- काही उद्योगांवर सरकारची मक्तेदारी असते.
- मुख्य आराखडा हा भांडवलशाही वर आधारित असतो.
- 1991 पासून भारताने खुल्या अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला आहे.




© Can Stock Photo